## प्रस्तावना

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली चे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य संत गाडगे बाबा यांच्या विचारांवर सुरु आहे . त्या दृष्टीने संस्थेचे अध्यक्ष मा. अरुणभाऊ शेळके, उपाध्यक्ष मा.महादेवरावजी भुईभार व प्राचार्य डॉ.नीलकंठ भुसारी सर यांच्या मार्गदर्शनात कार्य अविरतपणे चालू आहे.दत्तक ग्राम मुंगसरी सर्व अंगांनी आदर्श बनविण्याच्या हेतूने विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ भारत सुंदर भारत या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. विविध प्राध्यापक अधिकारी यांच्या व्याख्यानातून बौद्धिक सत्रामध्ये विध्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ समन्वयक प्रा. डॉ. गणेश माल्ट सर , जिल्हा समन्वयक प्रा. डॉ.दीपक नागरिक, क्षेत्रीय समन्वयक प्रा.डॉ. पोच्छी यांच्या विशेष सहकार्याने व मार्गदर्शनाने हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

## उदघाटन समारंभ

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील सन २०१६-१७ या शैक्षणिक सत्रातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक १२/१/२०१७ ते १८/१/२०१७ यादरम्यान मुंगासरी ता. चिखली जि.बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला.या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उदघाटन समारंभ दि १२/१/२०१६७ ला पार पडला उदघाटन समारंभास प्राध्यापक वृंद व सर्व गावकर्यांचि उपस्तिथी लाभली होती या कार्यक्रमास खालील अतिथी उपस्तीथ होते.

१) मा. श्री महादेवरावजी भूईभार साहेब (उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती)
२) मा. श्री डॉ.नीलकंठ भुसारी (प्राचार्य)
३) मा.श्री. डॉ डी. एम. नागरिक
४) मा. श्री जगदेवराव बाहेकर
५) मा.सौ. कल्पनाताई गाडेकर
६) मा. श्री गुलाबरावजी खेडेकर
७) मा. श्री मधुकरराव पवार
८) मा. श्री शिवशंकर इंगळे
९) मा. श्री समाधान इंगळे

**बौद्धिक सत्र**

**दि. १३ जानेवारी २०१७**

**विषय - स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन**

वक्ते- मा. श्री महेंद्र देशमुख साहेब (ठाणेदार पो.स्टे, चिखली )

आजच्या काळातील शिक्षण क्षेत्रातील क्रांती पाहता तसेच स्पर्धेच्या काळात टिकता यावे त्याकरिता योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने हे सत्र आयोजित केले होते. यावेळी बोलताना श्री महेंद्र देशमुख यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. किती वेळ व कसा अभ्यास करावा याचे मार्गदर्शन श्री महेंद्र देशमुख साहेबांनी केले. वेळेचे नियोजनाबाबत , पुस्तकांची निवड याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या सत्रास प्राचार्य डॉ. नीलकंठ भुसारी साहेब अध्यक्ष म्हणून लाभले होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक राज नेमाडे यांनी केले

**दि. १३ जानेवारी २०१७**

**विषय – युवा व्यक्तिमत्त्व विकास**

**वक्ते- मा, प्रा. अशोक पडघान सर (गो. से. महाविद्यालय खामगाव)**

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडून यावा व त्याकरिता योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून हे बौद्धिक सत्र आयोजित करण्यात आले होते. मा, प्रा. अशोक पडघन सर यांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास हाच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता कारणीभूत असतो आणि स्वतावर प्रचंड विश्वास व आत्मविश्वास ठेवावा.. मा, प्रा. अशोक पडघन सर यांनी विद्यार्थ्यांन या सत्रात अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

**दि. १४ जानेवारी २०१७**

**विषय – अंधश्रद्धा निर्मुलन**

**वक्ते- प्रा. जी. एम. डोंगरे**

विसाव्या शतकात यांत्रिक युगात जगताना खेडे विभाग व शहरातही काही प्रमाणात जनसामान्यांवर जादूटोणा ,बुवाबाजी वर अनेकांचा विश्वास आहे. त्याला काही तरुणही बळी पडतात. असे डोंगरे सरांनी आपल्या

व्याख्यानातून सांगितले व काही प्रात्यक्षिक करून दाखविले. अंधाश्राधा विरूद्ध आपण सर्व तरुणांनी एकत्र येऊन लढले पाहिजे व सुरुवात आपल्यापासून करायला हवी असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना व गावकर्यांना केले.

**दि. १५ जानेवारी २०१७**

**विषय – देशाच्या विकासात युवकांची भूमिका**

**वक्ते- डॉ.प्रफुल्ल गवई**

एकविसाव्या शतकात २०२० पर्यंत भारत विकसित व महाशक्तिशाली बनेल असे स्वप्न जगाला दाखविणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील महाशक्तिशाली भारत घडविण्यासाठी जगात प्रचंड युवा लोखासंख्या असलेल्या देशातील देशाप्रती युवकांची भूमिका डॉ. गवई सरांनी अत्यंत साधेपणाने परंतु प्रत्येक स्वयंसेवकाने व गावकर्यांना समजेल अशा भाषेत समजून सांगितले. तसेच आज आपली सामाजिक कर्तव्य काय? याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**दि. १६ जानेवारी २०१७**

**विषय –आधुनिक शेती व जोडधंदा**

**वक्ते- मा. मेरत साहेब (कृषी अधिकारी चिखली)**

आज शेताकार्याला विविध समस्यांना सामोरे जावे लागते कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ तर कधी सरकारची आर्थिक धोरणे. यामुळे जास्तीत जास्त ह्या जगाच्या पोशिन्द्याचेच नुकसान होते.शेतकरी नाविलाजाने आत्महत्या करतात. म्हणून शेतीच्या सोबतच असेल तर त्याच्यावर कर्जबाजारीपानाची वेळ येणार नाही. व तो समाजात सन्मानाने जगेल. त्याच्या सोबतीला जोडधंदा म्हणून, शेलीपला, दुधुत्पादन, गांडूळखत निर्मिती, मत्स्यपालन अशा अनेक्न प्रकारचे पर्याय उपलब्ध आहे. पण शेतकऱ्यांमध्ये पुरेशी जनजागृती न झाल्यामुळे त्यांना फक्त शेतीवरच अवलंबून राहावे लागते. पण जर शेतकर्याने जोडधंद्यात गुंतवणूक केली तर त्याच्या जीवनमानाचा दर्जा उंचावेल. अशी आशा त्यांनी व्यक्त केली. व शेतकऱ्यांसाठी नवीन नवीन उपक्रम सुचविले. या सत्रात गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१७ जानेवारी २०१७

**विषय – हुंडाबळी एक समस्या**

**वक्ते – मा. श्री शिवाजीराव नवघरे ( सामाजिक कार्यकर्ते)**

**अध्यक्ष- मा.सौ. प्रियाताई बोंद्रे (नगराध्यक्ष चिखली)**

सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. शिवाजीराव नवघरे साहेबांनी हुंडाबळी एक समस्या या विषयावर बोलताना हुंडा हि समाजाला लागलेली कीड आहे व आपल्या भारतीय समाजावर लागलेला डाग आहे. हुंड्यामुळे बदललेली समाजव्यवस्था यावर त्यांनी प्रकाश टाकला आजच्या सुशिक्षित युवकांनी हुंडा घेऊ नये देऊ नये व समाजात जनजागृती करावी. असे त्यानी आवाहन केले.हुंड्यामुळे मुलींचा होणारा छळ, वधूपित्याची आत्महत्या हे सारे प्रश्न त्यांनी विद्यार्थ्यांसमोर व गाव कर्यांसमोर मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांना संघटनेच्या , रासेयो च्या माध्यमातून समाजात जनजागृती करावे. समाजात हुंडाबळी समस्येवर खरी जनजागृती फक्त तरुण मुलीच करू शकतात व त्यांनी हिमतीने हे कार्य करावे. याप्रसंगी चिखलीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. सौ. प्रियाताई बोंद्रे यांनी हुंडाबळी एक समस्या या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.

१७ जानेवारी २०१७ मंगळवार

**विषय – सुरक्षित औषधोपचार**

**वक्ते – प्रा. प्रफुल्ल ताठे**

सुरक्षित औषोधउपचार या विषयावर बोलताना त्यांनी प्रथम वैद्यकीय क्षेत्राची माहिती दिली आपल्या शरीराची रचना, प्रतिकार क्षमता व आपल्याला होणार्या आजाराची माहिती दिली. ऋतूनुसार होणार्या आजारात आपण डॉक्टर यांच्या सल्ल्यानुसार उपचार केले पाहिजे.आपल्या मानाने औषधी घेऊ नये कारण औषधांचा आपल्या शरीरावर दुष्परिणाम होतात. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि जुनी औषधे घेऊ नये किंवा मेडिकल वरून डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधी घेतल्या पाहिजे.आपल्या मानने घेतलेल्या औषधांचा शरीरावर कसा आणि काय परिणाम होतो हे त्यांनी उदाहरणासहीत सोप्या भाषेत पटवून सांगितले.

## समारोप

विशेष श्रम संस्कार शिबिराचा समारोपाचा कार्यक्रम दि. १८/०१/२०१७ रोजी बुधवार ला संपन्न झाला. या समारोपाच्या कार्यक्रमाला मा. प्राचार्य डॉ. एन बी. भुसारी अध्यक्ष म्हणून लाभले होते. तसेच मा. श्री. संतोषराव डुकरे , मा. श्री मधुकरराव पाटील, माजी प्राचार्य मा. गुलाबारावजी खेडेकर यांची प्रमुख उपस्तिथी होती तसेच गावाचे सरपंच मा. सौ कल्पना ताई गाडेकर, उपसरपंच गावातील प्रतिष्टीत मंडळी , प्रध्यापाक वृंद , गावकरी मंडळी उपस्तीथ होती.

या समारोपाच्या कार्यक्रमात शिबिरात शिस्तीमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या स्वयंसेवकांना उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले. प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी यांनी शिबिरांतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करून पथकाला भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सरपंच सौ. कल्पनाताई गाडेकर यांनी गावात राबविलेल्या उपक्रमाबद्दल व प्रभात फेरीच्या तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यामातून रा.से.यो. स्वयंसेवकांनी विविध विषयावर गावकर्यांमध्ये केलेल्या प्रबोधनाबद्दल आभार मानले व पुढल्या वर्षी पुन्हा दत्तक ग्राम मुंगसरी येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या रा से यो पथकाने साहिबिराचे आयोजन करावे अशी विनंती प्राचार्यांना केली. या शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता कार्यक्रम अधिकारिण प्रा.एम.ए. पवार , डॉ. एस. एम. कालाखे यांनी परिश्रम घेतले.

## शिबिरादरम्यान राबविण्यात आलेले प्रकल्प

### १ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प

शहरांप्रमाणे खेड्यात देखील घनकचरा मोठी समस्या बनत चाललेली आहे. घन्काचार्यामध्ये प्लास्टिक, थामाकॉल या घटकांचा समावेश असतो. त्यामुळे मनुष्याच्या व पशूंच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता स्वच्ह व निर्मल ग्राम संकल्पना प्रत्यक्षात रुजविण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन हा प्रकल्प दत्तक ग्राम मुंगासरी येथे राबविण्यात आला. गावकर्यांमध्ये घनकचरा बद्दल जागृती करण्यात आली.

### २. रस्ता दुरुस्ती व रुंदीकरण

मुंगासरी गावातील मुख्य रस्तातसेच गावातील छोटे रस्ते वयाच्या कडेवरील स्वच्छता, दुरुस्ती , व रुंदीकरण करण्यात आले. रस्त्यामध्ये पडलेले खड्डे भरण्यात आले. गावातील महत्वाच्या रस्त्यांच्या मधेमध

तसेच कडेवर काचार्यांचा ढीग साचल्यामुळे रस्ते अरुंद झाले होते. गावकर्यांच्या सहकार्याने रा से यो स्वयंसेवकांनी ट्रक्टर मध्ये भरून घन कचरा व्यवस्थापन ठिकाणी जमा करण्यात आला अशा प्रकारे रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात आले. काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेवरील मोठे दगड , ट्रक्टर मध्ये भरून गावाबाहेरील बंधार्याजवळ बंधारा बांधणीसाठी नेण्यात आले.

**३ बंधारा बांधणी व दुरुस्ती**

गावाबाहेरील गाव नदीवर बांधण्यात आलेला बंधारा खचलेला होता. तो बंधारा गावकर्यांच्या सल्ल्याने पुन्हा बांधण्यात आले. या बंधार्यामुळे गावकर्यांना पाणी अडवा पाणी जिरवा संकल्पनेचे महत्व लक्षात आले.

**४ शौचखड्ड्याचि निर्मिती**

मुंगसरी हे गाव हागणदारी मुक्त करून गाव स्वच्छ व आजारापासून मुक्त करण्यासाठी गावात मोठ्या प्रमाणात शौचालय बांधण्यात् आलेले आहे. परंतु आर्थिक परीस्तीथी मुळे गावातील काही लोकांनी शौचालये बांधली नाही अशा कुटुंबाना रा. से. यो. स्वयंसेवकांनि श्रमदानातून तीन शौचखड्डे तयार करून दिले तसेच गावकर्यांच्या मदतीने त्यामध्ये सिमेंटची टाकी बसविण्यात आले.

**५ स्मशान भूमीचि स्वच्छता व सुशोभीकरण**

गावाबाहेरील म्हणजे गावात प्रवेश करताना लागणारी स्मशानभूमीची स्वच्छता व सुशोभिकरन करण्यात आले. स्मशानभूमीच्या भोवतालच्या जागेत भरपूर प्रमाणात कचरा व गांजर गावात होते त्यांचे निर्मुल करण्यात आले तसेच स्मशान भूमीला रंग देण्यात आले. स्मशान भूमीच्या भोवती वृक्षारोपण करण्यात आले.

**जनजागृतीपर व सांस्कृतिक कार्यक्रम**

गावात दररोज रा से य स्वयंसेवकांच्या वतीने सकाळी ७ ते ८ दरम्यान जनजागृती करण्याच्या उद्देशाने प्रभात फेरी काढण्यात येत असे. दररोज वेगवेगळ्या विषयांवर जनजागृती केली जात होती. जसे कि मतदान जनजागृती, कॅशलेस व्यवहार , स्वच्छता अभियान, बेटी बचाव बेटी पडाव , झाडे लावा झाडे जगवा. तासेच दररोज संध्याकाळी ८ ते १० दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात असे. त्यामध्ये सर्व रा. से. यो. स्वयंसेवक व गावकरी उत्स्फुर्तपणे भाग घेत असे. सांस्कृतिक कार्यक्रमात भजनाच्या कीर्तनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयांवर जसे हुंडाबळी, दारू मुक्ती , महिला साक्षामिकरन अशा विषयांवर प्रबोधन करण्यात आले.

**स्वच्छ अंगण स्पर्धेचे आयोजन**

गावात शिबीर दाखल झाल्याच्या दिवसापासन ते समारोपाच्या दिवसापर्यंत गावात स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी रा.से.यो. च्या वतीने "स्वच्छ अंगण स्पर्धा " आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ज्या गृहिणीचे अंगण स्वच्छ व सुंदर असेल त्यांना समारोप कार्यक्रमात प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आले. या स्पर्धेसाठी गावातील सहभागी स्पर्धकांच्या आन्गानाचे परीक्षण दररोज प्रा. डॉ. व्ही. यु. पोच्छी,प्रा.कालाखे ,प्रा. पवार यांनी केले.या निरीक्षणासाठी रा से यो गटप्रमुख उपस्थित राहत होते.

**गावातील मंदिरांच्या पायर्यांची बांधणी व स्वच्छता**

गावातील हनुमान व देवीच्या मंदिराच्या भोवतालचा परिसराची स्वच्छता करण्यात आली. मंदिराभोवती असलेल्या दगडांचा वापर करून मंदिराकरीता पायर्यां तयार करण्यात आले.

**कार्यक्रम अधिकारी** | **महिला कार्यक्रम अधिकारी** | **प्राचार्य**